# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./१२५० /२०१९ दि.०२/०५/२०१९

# परिपत्रक

**विषय :- नागरिकांना लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा उपलब्ध करून देणेबाबत.**

संदर्भ :- १) मा. सहसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कार्या. पत्र क्र. बैठक २०१६/प्र.क्र.१२७/विशि-३, दिनांक०५/१२/२०१८

२) मा. सहसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे कार्या. पत्र क्र. संकीर्ण-२०१९//प्र.क्र.१२७/विशि-३, दिनांक २४/०४/२०१९

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१५/प्र.क्र. १८९/नवि-१४, दि. २३ जुन २०१५ नुसार, राज्यातील पात्र व्यक्तीना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरीता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातुन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५ , दिनांक २८/४/२०१५ रोजी लागु करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम - ३ मध्ये नमुद करण्यात आल्यानुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने अध्यादेश लागु झाल्यानंतर ३ महिन्याच्या कालावधीच्या आत आणि त्यानंतर वेळोवेळी ते पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी आणि नियत कालमर्यादा या अध्यादेशाखाली अधिसुचित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५, अंतर्गत दिल्या जाणाऱ्या सेंवाची माहिती नागरिकांपर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीने कालबध्द नियोजन करून सेवा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने संदर्भीय पत्रान्वये निर्देशीत केल्यानुसार आपल्यास्तरावर आवश्यक कार्यवाही घ्यावी.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव

सहपत्र - संदर्भीय पत्र संलग्नित

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली,
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
५) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

D:\Maharashtra lokseva adhydesh 2015/C-14

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
कुलगुरुंचे कार्यालय
आवक क्र. 755 दि. 24/04/19
जावक क्र. 1125 दि. 24/4/19

2795 25/4/19
4079 29/4/19

महाराष्ट्र शासन

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
अस्थापना विभाग
आवक क्र. 1454 दि. 29/4/19
जावक क्र. ........ दि. ........

क्रमांक : -संकीर्ण-२०१९/प्र. क्र. १२७/विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक: २४.०४.२०१९.

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

विषय: नागरिकांना लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग पत्र क्र. संकीर्ण २०१६/प्र क्र. १२६/विशि -३, दि.२८/११/२०१६
२. मे. महाऑनलाईन लि. यांचे दि. १८/१२/२०१७ चे पत्र
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग पत्र क्र. बैठक २०१६/प्र क्र. १२६/विशि -३, दि.०५/१२/२०१८
४. मे. महाऑनलाईन लि. यांचे दि. ०६/०२/२०१९ चे पत्र

उपरोक्त विषय तसेच संदर्भान्वये मागील दोन वर्षापासून राज्य शासनाने पारदर्शकरित्या, सक्षमपणे तसेच विहित कालमर्यादेत सेवा पुरविण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ नुसार अधिसूचित केलेल्या सेवा विद्यापीठ व तंत्र शिक्षण संचनालयामार्फत नागरिकांसाठी आपले सरकार या पोर्टलद्वारे उपलब्ध केलेल्या आहेत.

सदर सेवांचा आढावा वेळोवेळी राज्य सेवा आयोगाकडून घेतला असता महाऑनलाईन कडून सादर केलेल्या माहितीनुसार असे दिसून येते की, शासनाने तंत्र संचनालयामार्फत सदर सेवा योग्यरित्या तसेच प्रभावीपणे राबवली आहे परंतु विद्यापीठांनी सदर सेवा गंभीरपणे घेतल्या नसून त्यांची अंमलबजावणी योग्य रित्या झालेली नाही.

Registrar immediate

महाऑनलाईनने ०१/०४/२०१८ ते ३१/०३/२०१९ पर्यंत प्राप्त झालेल्या तसेच निकाली काढलेल्या अर्जाची माहिती शासन विभागास सादर केली आहे. यांमध्ये MSBTE कडे ११८८० अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ९४६६ अर्ज निकाली काढण्यात आले, १३२८ अर्ज विद्यार्थ्यांना परत केले व १०८६ अर्ज प्रलंबित आहेत. तसेच सार्वजनिक विद्यापीठांतर्गत ४९२ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ७ अर्ज मंजूर करण्यात आले तसेच ६९ अर्ज नामंजूर करण्यात आले व ४१६ अर्ज प्रलंबित आहेत.

महाऑनलाईन प्रतिनिधींनी विद्यापीठांना संपर्क केला असता असे निर्दशनास आले की, अजुनही काही विद्यापीठ मॅन्युअल पद्धतीने प्रमाणपत्र देत आहेत किंवा आपले सरकार पोर्टल व्यतिरिक्त

इतर ऑनलाईन कार्यप्रणाली वापरत आहेत. सदर दोन्ही कार्यप्रणाली मुळे शासनाचा सेवा हक्क अधिनियम उद्देशांतर्गत येणाऱ्या प्रक्रिया साध्य होत नसून योग्य ती माहिती शासनाच्या वरील स्तरावर पोहचत नाही.

महाऑनलाईन प्रतिनिधींशी झालेल्या चर्चेनुसार या सेवांची माहिती तसेच उपयोगिता विद्यापीठाच्या संकेत स्थळामार्फत व विद्यापीठ तसेच त्यांच्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालय परिसरातील जाहीर सूचना फलकावर सूचना लावून विद्यार्थी तसेच इतर नागरिकांपर्यंत पोहचवणे आवश्यक आहे.तसेच https://aaplesarkar.mahaonline.gov.in हि लिंक विद्यापीठ व महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर प्रकाशित करणे गरजेचे आहे.

सदर बाब लक्ष्यात घेऊन आपल्याला कळविण्यात येते कि, लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवांची अमलबजावणी त्वरित करावी तसेच इतर वापरात असलेल्या कार्यप्रणालीमार्फत अर्ज स्वीकारणे येत्या दोन महिन्यात संपूर्णतः बंद करून सदर सेवा या आपले सरकार पोर्टलमार्फत देण्यात याव्या. आपले सरकार पोर्टल अंतर्गत दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिती नागरिकांपर्यंत तसेच आपल्या अधिनस्त असलेल्या महाविद्यालयापर्यंत योग्यरित्या पोहचेल याची तजवीज विद्यापीठ स्तरावर करावी.

उपरोक्त सेवांच्या सनियंत्रणासाठी जबाबदार अधिकाऱ्याची नेमणूक करून सदर सेवा अंमलात आणण्यासाठी कालबद्ध नियोजन करून शासनास कळविण्यात यावे व याबाबतचा अहवाल वेळोवेळी शासनास सादर करण्यात यावा. आपले सरकार पोर्टल हाताळण्यास प्रशिक्षणासाठी तसेच इतर तांत्रिक बाबीसाठी महाऑनलाइनच्या प्रतिनिधीशी संपर्क साधावा.

आपला,

(सिद्धार्थ खरात)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत

१. मुख्य आयुक्त ,राज्य मुख्य सेवा हक्क ,महाराष्ट्र राज्य.

२. कुलगुरू, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

३. संचालक, उच्च शिक्षण, पुणे.

४. सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

५. महाऑनलाईन लि,लोअर परेल ,मुंबई